सन २०१९-२० चंद्रपूर जिल्हयातील चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या इमारती बांधकामाचे पुरवणी मागणीद्वारे (४४१५ ०१९२) या योजनेंतर्गत मंजूर करण्यात आलेला निधी वितरीत करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१८१/फ-९**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक :- ३१ ऑगस्ट, २०१९**

**वाचा :-**

१. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वनबां-२०१९/प्र.क्र.५७/फ-९, दि.२८.०६.२०१९
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वनबां-२०१९/प्र.क्र.५८/फ-९, दि.२८.०६.२०१९
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वनबां-२०१९/प्र.क्र.५९/फ-९, दि.२८.०६.२०१९
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वनबां-२०१९/प्र.क्र.६०/फ-९, दि.२८.०६.२०१९
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वनबां-२०१९/प्र.क्र.६१/फ-९, दि.२८.०६.२०१९
६. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वनबां-२०१९/प्र.क्र.६२/फ-९, दि.२८.०६.२०१९
७. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वनबां-२०१९/प्र.क्र.६३/फ-९, दि.२८.०६.२०१९
८. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वनबां-२०१९/प्र.क्र.६४/फ-९, दि.२८.०६.२०१९
९. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक :- वनबां-२०१९/प्र.क्र.३०/फ-९, दि.१७.०७.२०१९
१०. वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पूरक-२०१९/प्र.क्र.९३/अर्थ-३, दिनांक ०९.०७.२०१९
११. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि. ०८.०७.२०१९
१२. महसूल व वन विभाग, शासन आदेश क्रमांक :- पूरक-२०१९/प्र.क्र.११७/ब-१, दिनांक १५.०७.२०१९
१३. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.५५/२१०/२०१९-२०, दि. २१.०५.२०१९
१४. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर, यांचे पत्र क्रमांक :- कक्ष-१/पी/यो/नबाप्र/चाबाप्र/प्र.क्र.५५/६१६/२०१९-२०, दि. १६.०७.२०१९

**प्रस्तावना :-**

राज्य योजने अंतर्गत सन २०१९-२० करिता चिचपल्ली (ता.जि.चंद्रपूर) येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे (४४१५-०१९२) या योजनेकरिता रु.१०००.०० लक्ष नियतव्यय मंजूर व अर्थसंकल्पीत आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.११ च्या परिपत्रकांन्वये अर्थसंकल्पीत निधीच्या ६० टक्केच्या मर्यादेत विविध शासन निर्णयान्वये रु.६००.०० लक्ष इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

चंद्रपूर जिल्हयातील चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे (४४१५-०१९२) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करिता रु.२८३८.४२ लक्ष इतक्या निधीची पुरवणी मागणी जून, २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात मान्य करण्यात आलेली आहे. वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१० च्या परिपत्रकान्वये विधानमंडळाच्या जून, २०१९ च्या पावसाळी अधिवेशनात मान्य करण्यात आलेल्या पुरवणी मागणीचा निधी वितरीत करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. त्यानुसार महसूल व वन विभागाने संदर्भ क्र.१२ च्या शासन निर्णयान्वये सन २०१९-२० चे खर्चाचे पूरक विवरणपत्र निर्गमित केलेले आहे.

त्याअनुषंगाने नियोजन व वित्त विभागास १०० टक्के निधी वितरणाचा प्रस्ताव सादर केला असता नियोजन व वित्त विभागाने वित्त विभागाच्या संदर्भ क्र.११ दिनांक ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकानुसार चंद्रपूर जिल्हयातील चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे (४४१५-०१९२) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करिता पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या रु.२८३८.४२ लक्ष निधीच्या ६० टक्के मर्यादेत म्हणजेच रु.१७०३.०५ लक्ष इतका निधी वितरणास सहमती दर्शविलेली आहे.

त्यानुसार नियोजन व वित्त विभागाने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे (४४१५-०१९२) या लेखाशिर्षाअतर्गत चंद्रपूर जिल्हयातील चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या प्रस्तावित ८ इमारती बांधकामाकरीता व बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक फर्निचर साहित्य खरेदी करण्याकरीता रु.१७०३.०५ लक्ष इतका निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी संदर्भ क्र.१३ व १४ वरील शासनास सादर केलेला प्रस्ताव तसेच वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१० व ११ येथील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, नियोजन व वित्त विभागाने दिलेल्या सहमतीस अनुसरुन खालील तक्त्यात दर्शविण्यात आल्यानुसार चंद्रपूर जिल्हयातील चिचपल्ली येथे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राच्या संदर्भ क्र.१ ते ९ येथील शासन निर्णयान्वये सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेल्या ८ इमारतीचे बांधकाम करण्याकरिता ५३- मोठी बांधकामे रु.१६३१.०५ लक्ष तसेच फर्निचर साहित्य खरेदी करण्याकरीता ५०-इतर खर्च रु.७२.०० लक्ष असा एकूण रु १७०३.०५.लक्ष इतका निधी (४४१५ ०१९२) या लेखाशिर्षा अंतर्गत खालील विहीत केलेल्या अटी व शर्तीस अधिन राहून वितरीत करण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात येत आहे.:-

| **अ.क्र.** | **प्रस्तावित कामे** | **सन २०१९-२० करिता प्रस्तावित रक्कम (रु.लाखात)** | **सन २०१९-२० करिता या आदेशान्वये वितरित करावयाची रक्कम (रु.लाखात)** |
|---|---|---|---|
| १ | प्रशासकीय इमारतीचे बांधकाम | ३३८.१६ | ३३८.१६ |
| २ | उपहारगृह इमारतीचे बांधकाम | १५३.०५ | ७.६५ |
| ३ | शैक्षणिक इमारतीच्या पूर्वकडील भागाचे बांधकाम | २८७.०७ | १८०.८५ |
| ४ | शैक्षणिक इमारतीच्या पश्चिमेकडील भागाचे बांधकाम | ३७८.९२ | २३८.७१ |
| ५ | शैक्षणिक इमारतीच्या दक्षिनेकडील भागाचे बांधकाम | ४४४.६६ | २८०.१३ |
| ६ | शैक्षणिक इमारतीच्या उत्तरेकडील भागाचे बांधकाम | ७८२.३८ | ४८९.१७ |
| ७ | मुलींच्या वसतिगृहाचे बांधकाम | १०७.०९ | ४८.१९ |
| ८ | मुलांच्या वसतिगृहाचे बांधकाम | १०७.०९ | ४८.१९ |
| ९ | बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रासाठी आवश्यक फर्निचर साहित्य खरेदी करणे | २४०.०० | ७२.०० |
| | **एकूण :-** | **२८३८.४२** | **१७०३.०५** |

बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे (४४१५-०१९२) या लेखाशिर्षाखालील अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत:-

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखडयाप्रमाणे, विहित कार्यपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना घ्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.

२. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करावे.

३. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन विकास), म.रा. नागपूर यांनी करुन घ्यावी.

४. वाटप करण्यात येणा-या अनुदानातून खर्च करताना यामध्ये कोणतीही वित्तिय अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी. तसेच सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशाची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.

५. उपरोक्त कामे मंजूर अनुदानातून उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. तसेच सदरहू विकासाची कामे सन २०१९-२० या आर्थिक वर्षात पूर्ण करण्यात यावीत. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

६. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही तसेच सर्व कामांच्या गुणवत्तेबाबत वेळोवेळी आवश्यकतेनुसार तपासणी करावी या सर्व बाबींची जबाबदारी मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर यांची राहील.

७. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

८. सदर मंजूर कामामध्ये द्विरुक्ती होणार नाही आणि मंजूर कामांव्यतिरिक्त कोणत्याही नवीन बाबीवर /नवीन क्षेत्रावर/ नवीन कामांवर खर्च करण्यात येणार नाही तसेच कामात कुठलीही अनियमितता होणार नाही याची दक्षता घ्यावी.

९. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपुरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

१०. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१९ व ०९.०७.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

११. शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१२. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी-२०११/प्र.क्र.१७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-१०, प्रधान शिर्ष ४४१५, कृषी विषयक संशोधन व शिक्षण यावरील भांडवली खर्च, ०६ वनीकरण, पंचवार्षिक योजना अंतर्गत योजना, राज्य योजना अंतर्गत योजना, (००४) संशोधन (००) (०२) बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चिचपल्ली (४४१५ ०१९२) या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२० करिता उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्र.६१८/व्यय-१०, दिनांक १४.०८.२०१९ अन्वये व वित्त विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१९ व दिनांक ०९.०७.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र/२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८३११६०३५९६४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SUJAY DEORAO DODAL

Digitally signed by SUJAY DEORAO DODAL
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, postalCode=400032,
street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=a6a471816b9dbfd727f2e5ec4825f4678c8393d846acd1c16b8936c8b3a519c6, ou=REVENUE AND FOREST,
o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SUJAY DEORAO DODAL
Date: 2019.08.31 16:10:20 +05'30'

**( सुजय दोडल )**
**सह सचिव (वने)**
**महसूल व वन विभाग**

**प्रत :-**

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र बांबू विकास मंडळ, नागपूर
५. मुख्य वनसंरक्षक (शिक्षण व प्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
६. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) चंद्रपूर
७. मुख्य वनसंरक्षक (संशोधन), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. संचालक, बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र, चिचपल्ली,चंद्रपूर
९. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१०. सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारत-१), मंत्रालय, मुंबई-३२.
११. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
१२. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
१३. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
१४. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)